# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २६५ वा बुधवार दि.२७ मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## शिंदे गटाने शेवटचा डाव टाकला, चार जणांची यादी भाजपकडे



मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने दक्षिण मुंबई, ठाणे, शिर्डी आणि नाशिक लोकसभा मतदारसंघावर दावा कायम ठेवला आहे. गेल्या काही दिवसांपासून शिवसेना आणि भाजपमध्ये या चार जागांवरुन धुसफूस आहे. मात्र, शिवसेनेने आपल्या इच्छुक उमेदवारांची नावे भाजपकडे पाठवली. या चारही जागा जिंकण्यासाठी लागणारे समीकरण आणि योग्य उमेदवार शिवसेनेकडे आहेत असा युक्तिवाद करण्यात आला आहे. सध्या महायुतीत वादात असलेल्या चारही जागी शिवसेनेचे खासदार आहेत. दक्षिण मुंबईत अरविंद सावंत, ठाणे लोकसभा मतदारसंघात राजन विचारे, शिर्डीत सदाशिव लोखंडे आणि नाशिक लोकसभेत हेमंत गोडसे खासदार आहेत. यापैकी अरविंद सावंत आणि राजन विचारे सध्या ठाकरे गटात आहेत.काही दिवसांपूर्वी भाजपचे केंद्रीय मंत्री अमित शहा मुंबईत आले होते. यावेळी अमित शहा आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात लोकसभेच्या जागावाटपाबाबत चर्चा झाली होती. या बैठकीत अमित शहा यांनी भाजप मुंबईतील सहापैकी पाच जागा लढवेल, असे स्पष्ट केले होते. तसेच लोकसभेच्या एकूण ३२ मतदारसंघात आमचेच उमेदवार रिंगणात उतरतील, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली होती. एकनाथ शिंदे यांना या प्रस्तावाला विरोध केला होता. शिंदे गटाने माघार घेतली नाही. मुंबईसह नाशिक, ठाणे आणि शिर्डीची जागा लढवण्याबाबत एकनाथ शिंदे अजूनही ठाम आहेत.महायुतीच्या ४८ पैकी ४६ जागा निश्चित? ठाणे लोकसभा मतदारसंघात भाजपचा उमेदवार असावा, यासाठी पक्षाचे स्थानिक नेते गेल्या अनेक महिन्यांपासून प्रयत्नशील आहेत. मात्र, एकनाथ शिंदे हे स्वत: ठाण्यात राहतात. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्यादृष्टीने ठाणे लोकसभेची जागा प्रतिष्ठेची आहे. परिणामी एकनाथ शिंदे ही जागा सोडण्यासाठी तयार नाहीत. तर नाशिकमध्ये श्रीकांत शिंदे यांनी परस्पर हेमंत गोडसे यांची उमेदवारी घोषित केल्याने भाजपचे शांतीगिरी महाराज नाराज झाले आहेत. त्यांनी याठिकाणी अपक्ष लढण्याची भूमिका घेतली आहे. तर दक्षिण मुंबईची जागा भाजपने मनसेला देण्याचे ठरवल्याची चर्चा आहे. एकीकडे महायुतीच्या नेत्यांकडून ४८ पैकी ४६ जागांबाबत एकमत झाल्याचे सांगितले जात असले तरी अनेक जागांचा तिढा अद्याप कायम आहे. त्यामुळे आता २८ मार्चला महायुतीचे अंतिम जागावाटप जाहीर झाल्यानंतरच नेमके चित्र स्पष्ट होऊ शकेल.

## आढळराव पाटील यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

पुणे : शिवसेना नेते शिवाजी आढळराव पाटील यांनी आज अखेर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आढळराव पाटील यांनी राष्ट्रवादीचं घड्याळ हाती घेतलं. शिवाजी आढळराव पाटील राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करतील, अशी गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा होती. त्यानंतर आज अखेर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.शिवाजी आढळराव पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून शिरुर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळणार आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत शरद पवार गटाचे उमेदवार अमोल कोल्हे यांच्या विरोधात अजित पवार गटाचे आढळराव पाटील अशी लढत आता बघायला मिळणार आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत अमोल कोल्हे यांनी आढळराव पाटील यांचा पराभव केला होता. त्यानंतर आगामी निवडणुकीत पुन्हा अमोल कोल्हे विरुद्ध शिवाजी आढळराव पाटील अशी लढत बघायला मिळण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राज्यात वेगवेगळ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. प्रत्येक पक्षाकडून उमेदवारांची निवड केली जात आहे. काही ठिकाणी उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. सत्ताधारी आणि विरोधकांकडून जागावाटप निश्चित करण्यात येत आहे.या घडामोडी गेल्या अनेक दिवसांपासून सुरु आहेत. विशेष म्हणजे शिरुर लोकसभा मतदारसंघाबाबत गेल्या काही दिवसांपासून सस्पेन्स वाढला होता. कारण या मतदारसंघात सध्या राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे नेते अमोल कोल्हे हे खासदार आहेत. त्यामुळे या जागेवर अजित पवार गटाचा दावा होता.



## नागपूर, रामटेक महायुती नामांकन; शक्तिप्रदर्शन, मुख्यमंत्री- उपमुख्यमंत्री येणार



नागपूर; नागपूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, रामटेक लोकसभा मतदार संघाचे उमेदवार राजू पारवे उद्या बुधवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. मंगळवारी काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यानिमित्ताने कधी नव्हे ते काँग्रेस नेत्यांचे एकजुटीचे आणि हजारो कार्यकर्त्यांचे शक्तिप्रदर्शन पहायला मिळाले. रामटेक लोकसभा मतदारसंघातील माजी मंत्री सुनील केदार गटाच्या काँग्रेस उमेदवार रश्मी बर्वे या देखील उद्याच नामांकन दाखल करणार आहेत. दरम्यान, उद्या भाजप-शिवसेना महायुतीचे शक्तीप्रदर्शन पाहायला मिळणार आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती राहणार आहे. यासोबत पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे नेते प्रा. जोगेंद्र कवाडे, माजी राज्यमंत्री श्रीमती सुलेखाताई कुंभारे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) नेते प्रशांत पवार, लोक जनशक्ती पार्टीचे विदर्भ प्रदेश अध्यक्ष सतीश लोणारे उपस्थित राहणार आहेत.जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज दाखल करण्यापूर्वी नितीन गडकरी संविधान चौकात सकाळी ९.३० वाजता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बख्त बुलंद शहा चौकात गोंड राजे बख्त बुलंद शाह यांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडे रवाना होणार आहेत.

## पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी पोलीस कर्मचारी, कवी, साहित्यिक उत्तम तरकसे यांचा गौरव केला



मुंबई :- महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक श्रीमती रश्मी शुक्ला यांची महाराष्ट्र राज्य शासनाचा समाजभूषण पुरस्काराने सन्मानित साहित्यिक उत्तम तरकसे यांनी त्यांच्या कार्यालयात नुकतीच भेट घेतली याप्रसंगी श्रीमती रश्मी शुक्ला यांनी साहित्यिक आणि वर्दी तील एक पोलीस कर्मचारी उत्तम दा. तरकसे यांचा गौरव केला. तसेच त्यांच्या साहित्यिक वाटचालीस शुभकामना देखील प्रगट केल्या.

## भाजपचे लोकसभेसाठी आणखी ३ उमेदवार जाहीर, हिमाचल प्रदेश विधानसभा पोटनिवडणुकीसाठी ६ उमेदवारांची घोषणा

नवी दिल्ली, : भाजपने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी सहाव्या यादीत तीन उमेदवार जाहीर केले आहेत. राजस्थानमधील दोन तर मणिपूरमधील एक उमेदवार यामध्ये जाहीर करण्यात आले. तसेच हिमाचल प्रदेश विधानसभा पोटनिवडणुकीसाठी सहा उमेदवारांची घोषणा भाजपने केली आहे. हे सर्व सहाही उमेदवार काँग्रेसमधुन बंडखोरी करुन भाजपत सामिल झालेले नेते आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने उमेदवार जाहीर करण्यात आघाडी घेतली. मंगळवारी भाजपने पुन्हा एक यादी जाहीर केली. यामध्ये राजस्थानच्या करौली ढोलपूरमधून इंदू देवी जाटव, दौसा मतदारसंघातून कन्हैया लाल मीणा यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर मणिपूरमधून थौनाआजम बसंत कुमार सिंह यांना उमेदवारी देण्यात आली आहे. सोबतच विविध राज्यांमध्ये होत असलेल्या विधानसभा पोट निवडणुकीच्या उमेदवारांची यादीही भाजपच्या वतीने जाहीर करण्यात आली आहे. गुजरात मधील चार, हिमाचल प्रदेशातील सहा, कर्नाटकमधील



एक तर पश्चिम बंगालमधील दोन उमेदवार जाहीर केले आहेत. काही दिवसांपूर्वी हिमाचल प्रदेशात राज्यसभेच्या एका जागेसाठी निवडणूक पार पडली. यात काँग्रेसच्या काही आमदारांनी भाजप उमेदवाराला मतदान केले होते. परिणामी काँग्रेस उमेदवार अभिषेक मनू सिंघवी यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यानंतर या सहा आमदारांना विधानसभा अध्यक्षांनी अपात्र घोषित करून त्यांचे सदस्यत्व रद्द केले. पुढे २३ मार्चला हे सहाही लोक भाजपमध्ये सामील झाले. सोबतच इतर तीन आमदारही भाजपमध्ये सामील झाले. आणि आता त्या ठिकाणी लागलेल्या विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपने त्यांना उमेदवारी दिली आहे. १ जूनला हिमाचलमधील नऊ जागांवर पोटनिवडणूक होणार आहे. काँग्रेसच्या सहा बंडखोर नेत्यांपैकी सुधीर शर्मा यांना धर्मशाला विधानसभा मतदारसंघातून तर रवी ठाकूर यांना लाहौल व स्पितीमधून, राजेंद्र राणा यांना सुजाणपूरमधून, इंद्र दत्त लखनपाल यांना बडसरमधून, चैतन्य शर्मा यांना गगरेटमधून तर देवेंद्र कुमार यांना कुटलैहडमधून उमेदवारी देण्यात आली आहे. याच जागांवर हे नेते आमदार होते.

## लातूरच्या विकासासाठी हक्काचा वाढपी दिल्लीत पाठवूया आमदार धिरज देशमुख यांचे भावनिक आवाहन

### ऊर्जास्थळी नतमस्तक

रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील चैत्यस्मारक येथे जावून भगवान बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी कलशाचे दर्शन आमदार श्री. धिरज देशमुख आणि डॉ. शिवाजी काळगे यांनी यावेळी घेतले. भगवान बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना अभिवादन केले. त्यानंतर पानगाव येथील प्रतिपंढरपूर असलेल्या श्री विठ्ठल मंदिरात जावून त्यांनी विठ्ठलाची पूजा केली. तसेच, रेणापूर येथील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री रेणुकादेवी मातेचे दर्शन घेवून त्यांनी पूजन केले.





लातूर : लातूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे, विमानतळ, पाणी असे प्रश्न सरकारदरबारी अडकले आहेत. तर दुसरीकडे आयआयटी, आयआयएम सारख्या संस्था लातूरात उभ्या राहिल्या पाहिजेत. तरुणांना रोजगार मिळाला पाहिजे. अशा विषयांना वाचा फोडून त्याची सोडवणूक करण्यासाठी आपल्या विचाराचे खासदार संसदेत असले पाहिजेत. डॉ. शिवाजी काळगे यांच्या रूपाने आपण आपल्या हक्काचा वाढपी दिल्लीत पाठवून लातूरसाठी अधिकाधिक विकासकामे खेचून आणू, असे आवाहन 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी येथे केले. लातूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या उपस्थितीत लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात ग्रामस्थ, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या समवेत संवाद बैठका आयोजिण्यात आल्या आहेत. याची सुरुवात मंगळवारी (ता. २६) करण्यात आली. पानगाव, कोष्टगाव, कारेपूर, खरोळा या गावांत बैठका घेण्यात आल्या. तर घनसरगाव, मुरढव, पाथरवाडी, दिवेगाव, रामवाडी (ख) आदी गावांना भेटी देण्यात आल्या. यावेळी संवाद साधताना आमदार श्री. धिरज देशमुख यांनी माजी मुख्यमंत्री, लोकनेते विलासराव देशमुख यांच्या गाजलेल्या विधानाची आठवण करू दिली. 'वाढपी हा आपल्या हक्काचा असला पाहिजे.' असे विलासराव देशमुख सांगत असत. त्या दृष्टीने आपण कामाला लागून लातूरची जागा मोठ्या मताधिक्याने विजयी करून दाखवू, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. ही केवळ निवडणूक नसून ही लढाई आहे, वाढत्या बेरोजगारी विरोधात, वाढत्या महागाई विरोधात. लोकशाहीचे संरक्षण करण्यासाठीचा हा लढा आहे. त्यामुळे सर्वांनी सजग रहावे, असे सांगून आमदार श्री. धिरज देशमुख म्हणाले, शेतकरी, महिला, विद्यार्थी, युवक यांच्यासाठी केंद्र सरकारने गेल्या १० वर्षांत काहीही केले नाही. काँग्रेसच्याच जुन्या योजनांची नावे बदलून त्या नव्याने राबवल्या. एम. एस. स्वामिनाथन यांना भारतरत्न दिले; पण त्यांच्या सूचनांकडे पाठ फिरवली. शेतकऱ्यांचे म्हणणेही ऐकून घेतले नाही. त्यामुळे जनता सरकारच्या कारभाराला वैतागली आहे. काँग्रेस सर्वांना बरोबर घेवून जाणारा पक्ष आहे. त्यामुळे काँग्रेसच आजच्या अडचणीच्या काळात सामान्यांना न्याय देईल, असा जनतेला ठाम विश्वास वाटत आहे. म्हणून पक्षाच्या कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी पक्षाची ध्येयधोरणे, पक्षाचे काम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावे, असे आवाहनही आमदार श्री. धिरज देशमुख यांनी केले. लोकसभेची ही निवडणूक देशाला दिशा देणारी, विकासाची नवी दृष्टी देणारी आहे. ही एक वैचारिक लढाई आहे. त्यामुळे सर्वांना सोबत घेऊन जाणाऱ्या काँग्रेस पक्षाला आपण बळ द्यावे, असे आवाहन डॉ. काळगे यांनी केले. यावेळी त्र्यंबक भिसे, सर्जेराव मोरे, यशवंतराव पाटील, किरण जाधव, अनुप शेळके, प्रमोद जाधव, अनंतराव देशमुख, रमेश सूर्यवंशी, विश्वास देशमुख, लालासाहेब चव्हाण, उमाकांत खलंग्रे, चंद्रचूड चव्हाण, इम्रान सय्यद, शेषराव हाके पाटील, संजय वारद, चंद्रकांत आरडले, गयाताई कस्पटे, शिवाजी आचार्य, धनंजय चव्हाण, सत्यवान भंडारे, उत्तरेश्वर हलकुडे, किरण हनवते, उमर पठाण, अभिजित चव्हाण, व्ही. के. आचार्य, स्वाती सोमाणी, संग्राम माटेकर, गणपतराव माने, हरिश्चंद्र लहाने, प्रभाकर केंद्रे, चंद्रकांत सूर्यवंशी, पूजा इगे, धनराज देशमुख, अनिल कुटवाड, बाळकृष्ण माने, प्रवीण माने, श्रीपतराव माने, उमेश सोमाणी, अमर वाकडे, विश्वनाथ कागले, हणमंत पवार, गोविंद पाटील, प्रदीप काळे, प्रदीप कापसे, गुलाब चव्हाण, बाळासाहेब करमुडे, शंकर कपाळे, पांडूरंग काळे, जयंतराव कुलकर्णी, धनंजय देशमुख, व्यंकट होळंबे, प्रताप पाटील, बाबाराव पाटील, राजेंद्र डाके आदीसह पानगाव, कोष्टगाव, कारेपूर व खरोळा पंचायत समिती गणातील काँग्रेस पक्षाचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# निवडणूक रोख्यांचा रोख नेमका कोणाकडे?

एक गोष्ट नक्की आहे की, निवडणूक रोख्यांच्या मदतीने कोणत्या पक्षाला किती देणग्या मिळाल्या आणि देणगीदारांना त्याबदल्यात काय मिळाले, या मुद्द्याचा लोकसभा निवडणुकीवर काहीही परिणाम होणार नाही. प्रचारात हा मुद्दा कितपत प्रभावी ठरेल हेसुद्धा सांगता येणार नाही; मात्र न्यायालयाच्या दणक्यानंतर स्टेट बँकेने जाहीर केलेला देणग्यांचा तपशील आणि त्यातून समोर येणारी अर्थपूर्ण देवाणघेवाण पाहता, एकूणच या व्यवस्थेबद्दलचा गांभीर्याने विचार मतदारानाच करावा लागणार आहे. निवडणूक रोख्यांद्वारे राजकीय पक्षांना देणगी देण्यासाठी आणलेल्या योजनेत निनावी देणग्यांमुळे अनपेक्षित परिणाम होणार, या देणग्यांचे सर्वाधिक लाभार्थी सत्ताधारी ठरणार, या योजनेमध्ये बनावट कंपन्यांचा वापर राजकीय देणग्यांसाठी होणार, अशी भीती निवडणूक रोखे योजनेबद्दल सातत्याने व्यक्त होत होती. २०१९ मध्ये निवडणूक रोखे योजना लागू झाल्यानंतर खुद्द निवडणूक आयोग आणि रिझर्व्ह बँकेने याबाबतचे इशारे दिले होते. निवडणूक रोख्यांचे खरेदीदार कोण होते आणि योजनेत कोणाला किती निधी मिळाला, याची माहिती सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर समोर आली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार स्टेट बँकेने निवडणूक आयोगाकडे रोख्यांचा तपशील दिला आणि आयोगाने हा तपशील १४ मार्चला जाहीर केला. रोख्यांची खरेदी आणि देणगी मिळालेले राजकीय पक्ष यांच्यातील व्यवहारांचे नेमके चित्र स्पष्ट करण्यासाठी हा तपशील अपूर्ण होता. कोणत्या खरेदीदाराने कोणाला रोख्याद्वारे कधी आणि किती देणगी दिली, हे कळण्यासाठी रोख्यांची ओळख पटविणारे विशिष्ट सांकेतिक क्रमांक, अंकाक्षरी क्रमांक (अल्फान्युमेरिक नंबर) हा तपशील देण्यासाठी स्टेट बँकेची टाळाटाळ पाहून सर्वोच्च न्यायालयाने तंबी दिली. 'निवडक माहिती नको, तर खरेदी झालेले रोखे, राजकीय पक्षांनी वटविलेले रोखे, त्या रोख्यांचा अनुक्रमांक आणि अंकाक्षरी क्रमांक असा संपूर्ण तपशील द्या,' असे ठणकावल्यानंतर २१ मार्चला नेमकी माहिती समोर आली.वर्तमान राजवटीमध्ये तपास यंत्रणांची भूमिका राजकीयदृष्ट्या आधीच वादग्रस्त असताना तपास यंत्रणांचे कॉर्पोरेट कंपन्यांवरील छापे आणि या कंपन्यांना मिळालेली सरकारी प्रकल्पांची कंत्राटे, कॉर्पोरेट कंपन्यांनी कोट्यवधी रुपयांचे रोखे खरेदी केल्याच्या तारखा आणि या कंपन्यांकडून राजकीय पक्षांना विशेषतः सत्ताधार्यांना मिळालेल्या देणग्या यांचा परस्पर संबंध जोडून आरोप सुरू झाले आहेत. कॉर्पोरेट समूह, कंपन्या आणि व्यक्तींनी एप्रिल २०१९ ते जानेवारी २०२४ या कालावधीत १२,१५५ कोटी रुपयांचे रोखे खरेदी केले आणि राजकीय पक्षांनी १२,७६९ कोटी रुपयांचे रोखे वटविले. आता ही जाहीर झालेली माहिती आणि त्याआधारे स्टेट बँकेने कोणाला किती बाँड दिले आणि खरेदीदार कंपन्यांचे आर्थिक व्यवहार, त्यांचा व्यवसाय यांची पडताळणी करून याचिकाकर्त्यांनी मिळविलेली माहिती, यातून आता सुरस कहाण्या समोर येत आहेत. यासोबतच सक्तवसुली संचलनालय (ईडी), सीबीआय किंवा प्राप्तिकर खात्यातर्फे चौकशी सुरू असलेल्या कंपन्यांनी जवळपास ४,७८७ कोटी रुपयांचे रोखे खरेदी करून एकाच राजकीय पक्षाला देणगी देण्याचे कारण काय? एक रुपयाचाही नफा न कमावणार्या कंपन्यांना तोटा सहन करून स्वतःच्या कनवटीचे कोट्यवधी रुपयांच्या देणग्या राजकीय पक्षांना देण्याचा उमाळा येतो कसा? काही देणगीदार कंपन्यांचा लॉटरीचा व्यवसाय असला तरी त्यांच्या निधीचा नेमका स्रोत काय? मुदत संपलेले (एक्स्पायर झालेले) निवडणूक रोखे वटविण्यासाठी स्टेट बँकेकडून एका राजकीय पक्षाला परवानगी देण्यात आली होती, हे अर्थमंत्रालयाच्या अनुमतीनंतर झाले होते काय? सर्वसामान्य ग्राहकांसाठी बँकिंग सेवा देताना शुल्क आकारणार्या स्टेट बँकेने निवडणूक रोख्यांची छपाई, हाताळणी यासाठी शुल्क आकारले की ही सेवा निःशुल्क दिली? यासारखे अनेक चिंताजनक प्रश्न यातून तयार झाले आहेत.२० हजार कोटी रुपयांच्या निवडणूक रोख्यांपैकी आपल्याला केवळ सहा हजार कोटी रुपये मिळाले; मात्र चौदा हजार कोटी रुपये तर विरोधकांना मिळाले आहेत, हा भाजपचा युक्तिवाद एकीकडे आहे, तर दुसरीकडे काँग्रेससारख्या विरोधी पक्षांनी सत्ताधार्यांना लक्ष्य करताना या सर्व आर्थिक व्यवहारांची आणि एकूणच निवडणूक रोखे योजनेची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली विशेष पथक नेमून चौकशीची मागणी केली आहे; परंतु स्वतःला मिळालेल्या देणग्यांबद्दल राजकीय पक्ष पारदर्शकपणे खुलासा करत आहेत काय, या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी मिळते.एकूणच, या संपूर्ण प्रकारामुळे देशाच्या एकूण राजकीय व्यवस्थेतील आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकतेचा असलेला अभाव अधोरेखित होतो आहे. सत्तेच्या दबावातून, प्रभावातून अथवा प्रलोभनातून राजकीय पक्षांना देणग्या मिळत असतील तर त्याचा घातक परिणाम लोकशाहीवर होणार आहे. यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा येतो तो म्हणजे या अवैध ठरलेल्या योजनेतील संदिग्ध व्यवहारांची चौकशी होणार काय आणि रोखे योजना आणण्यासाठी लोकप्रतिनिधित्व कायदा, प्राप्तिकर कायदा, भारतीय रिझर्व्ह बँक कायदा, परदेशी देणग्यांचे नियमन करणारा एफसीआरए कायदा, कॉर्पोरेट कंपन्यांची देणग्यांची मर्यादा वाढविण्यासाठी कंपनी कायद्यात केलेली दुरुस्ती हे सारे कायदे पूर्ववत होणार काय, या प्रश्नांची उत्तरे लोकसभा निवडणुकीच्या निकालावर अवलंबून असतील. अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेली लोकसभेची निवडणूक सत्ताधार्यांसाठी ४०० पारचे गणित जुळविण्यासाठी जेवढी प्रतिष्ठेची आहे, तेवढीच विरोधी पक्षांमधील अनेकांसाठी ही अस्तित्वाची लढाईदेखील आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंनी प्रचाराची धुळवड सुरू झाली आहे. यामध्ये राजकीय पक्षांच्या देणग्या, कॉर्पोरेट जग आणि राजकीय जग यांच्यातील आर्थिक संबंधांवर लागलेले प्रश्नचिन्ह आणि याचा अपरिहार्यपणे सर्वसामान्यांवर होणारा परिणाम याची चर्चा होईल की हा मुद्दा हवेतच विरणार, हेदेखील पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# जागावाटप होण्याआधीच युती, आघाडीत बंडाचे झेंडे !

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली- चिमूर, भंडारा - गोंदिया व रामटेक या पाच मतदारसंघात १९ एप्रिलला निवडणूक होणार आहे. तेथे उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून, बुधवार, २७ तारखेपर्यंत ही मुदत आहे. मात्र अजूनही महाविकास आघाडी व महायुतीतील जागावाटपाचा गोंधळ संपलेला नाही. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचितला सोबत घेण्याचे महाविकास आघाडीचे प्रयत्न यशस्वी होण्याची शक्यता जवळपास मावळली आहे. दुसरीकडे राज ठाकरे यांच्या मनसेला सोबत घेण्यासाठी भाजपाच्या प्रयत्नांना यश येणार की नाही? याबाबतचा सस्पेन्स अजूनही संपलेला नाही.जे आधीपासून एकत्र आहेत, त्यांच्यातही सर्व आलबेल आहे असे नाही. तीन वर्ष सत्तेत एकत्र राहिलेल्या महाविकास आघाडीत व सत्तेसाठी एकत्र आलेल्या महायुतीतही एकेका जागेसाठी घमासान सुरू आहे. संख्याबळ कमी असतानाही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला व अजित पवारांच्या राष्ट्रवादीला राज्याच्या सत्तेत बरोबरीचे स्थान दिल्यामुळे ते आपण सांगू त्या जागावाटपावर तयार होतील, असे भाजपाला वाटत असावे. या दोन्ही पक्षांना एक अंकी जागा देऊन, स्वत: ३३ ते ३५ जागा लढवण्याचा भाजपाचा विचार होता. उद्धव ठाकरेंना सोडून शिंदे यांच्यासोबत आलेल्या १३ विद्यमान खासदारांच्या जागा तरी त्यांना मिळणार की नाही, अशी स्थिती होती. पण शिंदे, अजित पवार यांनी ठाम भूमिका घेतल्याने भाजपाचा दोन तृतीयांश जागा लढवण्याचा प्रयत्न यशस्वी होताना दिसत नाही. फोडाफोडीचे राजकारण करून जमा केलेल्या गर्दीमुळे शक्ती वाढण्याऐवजी त्यांची डोकेदुखी वाढल्याचे दिसत आहे. गेल्या चार-साडेचार वर्षांत महाराष्ट्रात राजकारणाचा पार चिखल झाला आहे. त्यामुळे यंदाची धुळवडही जोरात आहे. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन प्रमुख पक्ष फोडून, बहुसंख्य आमदार, खासदार बरोबर आले तरी महाराष्ट्रातील यशाबद्दल खात्री वाटत नाही. त्यामुळे आणखी मित्र जोडण्याचा प्रयत्न सुरू आहे. काँग्रेसमधील काही बड्या नेत्यांना पक्षात आणल्यावर राज ठाकरे यांना महायुतीत आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी मागच्या आठवड्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना दिल्लीत बोलावले होते. या दोघांत तब्बल ४० मिनिटे चर्चा झाली. या भेटीमुळे मनसे महायुतीत सहभागी होणार हे जवळपास निश्चित झाल्याचे मानले जात आहे. शिवसेनेचे दोन तृतीयांश खासदार, आमदार शिंदेंसोबत असले तरी सामान्य शिवसैनिक व शिवसेनेचा परंपरागत मतदार अजूनही उद्धव ठाकरे यांच्याच सोबत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे राज ठाकरे यांच्या रूपाने एक ठाकरे आपल्या सोबत आले तर त्याचा फायदा होईल. गर्दी खेचण्याची क्षमता असणारा वक्ता उपलब्ध होईल, असे त्यांना वाटत असावे. पण अमित शहा व राज ठाकरे यांच्या भेटीला आठवडा होत आला तरी अजून युतीची घोषणा होऊ शकलेली नाही. याचे कारण म्हणजे मनसेला लोकसभेचे दक्षिण मुंबई व नाशिक हे दोन मतदारसंघ हवे आहेत व एकनाथ शिंदे कोणत्याही स्थितीत नाशिक सोडायला तयार नाहीत. शिवसेनेचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे शिंदे यांच्यासोबत आहेत. एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव व खासदार श्रीकांत शिंदे यांनी मागच्या आठवड्यात तेच यावेळीही उमेदवार असतील असे जाहीर केले आहे. त्यामुळे शिंदे यांनी ही जागा प्रतिष्ठेची केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज ठाकरे यांची आज एका पंचतारांकित हॉटेलात प्रदीर्घ चर्चा झाली. बुधवारी मध्यरात्री देखील फडणवीस आणि राज ठाकरे यांची गुप्त बैठक पार पडली. 'अशा भेटी होतच असतात', असे सांगत फडणवीस यांनी अधिक बोलायचे टाळले. पण मनसेला नाशिकची जागा सोडण्यास शिंदे तयार नसल्याने कोंडी झाल्याची कुजबुज आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची गुरुवारी एका पंचतारांकित हॉटेलमध्ये जवळपास दीड तास चर्चा झाली. पण त्यानंतरही महायुतीतला जागावाटपाचा तिढा सुटलेला नाही. राज ठाकरे महायुतीत आल्यानंतर येणा-या काळात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना त्यांच्याकडे सोपवण्याची भाजपाची रणनीती असल्याची कुजबुज राजकीय वर्तुळात आहे. त्यामुळे संशयकल्लोळ नाट्य सुरू झाले आहे.शिंदेंनी अंदाज चुकवला ! ५० आमदारांचा पाठिंबा असतानाही ११५ आमदार असलेल्या भाजपाने त्यांना मुख्यमंत्रिपद दिले. पण सरकारवर भाजपाचाच अंकुश असेल, त्याचसाठी देवेंद्र फडणवीस यांना इच्छा नसतानाही उपमुख्यमंत्रिपद घ्यायला लावले गेल्याची चर्चा होती. परंतु गेल्या पावणेदोन वर्षात शिंदे यांनी सत्तेवर चांगली पकड घेतली आहे. भाजपने देऊ केलेल्या मूठभर जागा स्वीकारण्यास ठाम नकार दिला. विद्यमान खासदारांबरोबरच शिवसेनेचे प्राबल्य असलेल्या आणखी चार जागांवर दावा सांगितला आहे. शिरूर मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे विद्यमान खासदार अमोल कोल्हे शरद पवार यांच्या गटात आहेत. या जागेसाठी राष्ट्रवादीचा आग्रह होता. पण या मतदारसंघाचे पूर्वी प्रतिनिधित्व केलेले शिवाजीराव आढळराव शिंदे यांच्या सोबत आहेत. शिंदेंनी त्यांच्यासाठी आग्रह धरला. राष्ट्रवादीला जागा हवी असेल तर देऊ, पण उमेदवारी आढळरावांनाच द्यावी लागेल, ही अट राष्ट्रवादीला मान्य करायला लावली आहे. शिंदे गटाचे माजी मंत्री विजय शिवतारे यांनी बारामतीत अजित पवार यांच्या विरोधात दंड थोपटले आहेत. त्यांना माघार घ्यायला लावा, नाहीतर कल्याणमध्ये श्रीकांत शिंदे यांची अडचण करू या राष्ट्रवादीच्या इशा-याची त्यांनी दखलही घेतलेली नाही.अजित पवार यांच्यापुढे आव्हान ! राष्ट्रवादी काँग्रेस एकसंध असताना अजित पवार यांच्या शब्दाला वजन होते. महाविकास आघाडी सरकारमध्ये तर त्यांचीच 'दादा'गिरी होती. सवता सुभा स्थापन करून भाजपासोबत गेल्यानंतर त्यांना सत्ता मिळाली, पण त्यांच्यासमोरील प्रश्न मात्र वाढत चालले आहेत. बारामतीत सुप्रिया सुळे यांच्या विरोधात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. यामुळे पवार कुटुंबात फूट पडून अजित पवार एकाकी पडले आहेत. त्यांचे पूर्वीचे सगळे विरोधक जुने हिशेब चुकते करण्यासाठी पुढे सरसावले आहेत. विजय शिवतारे यांच्या पाठोपाठ इंदापूरचे हर्षवर्धन पाटीलही विरोधात उतरले आहेत. शिवतारे, हर्षवर्धन पाटील यांना विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या विरोधाचा फटका बसला होता. त्याची परतफेड करण्याची संधी ते सोडणार नाहीत. हर्षवर्धन पाटील भाजपात असल्याने पक्षाने आदेश दिल्यानंतर ते कदाचित शिवतारे यांच्यासारखा थेट विरोध करणार नाहीत, पण मदत करतील याची शक्यता कमीच आहे. रणजित निंबाळकर, नवनीत राणाविरुद्ध पुन्हा सगळे एकवटले ! माढा मतदारसंघाचे विद्यमान खासदार रणजित नाईक निंबाळकर यांना भाजपाने पुन्हा उमेदवारी दिली आहे. यामुळे मोहिते पाटील, रामराजे नाईक निंबाळकर नाराज झाले आहेत. मोहिते पाटील यांना भाजपात आल्यापासून काहीही मिळालेले नाही. यावेळी लोकसभेची उमेदवारी मिळेल अशी त्यांची अपेक्षा होती. पण ती पूर्ण न झाल्याने त्यांनी उघडपणे विरोध केला आहे. तिकडे अमरावती मतदारसंघातून मागच्यावेळी नवनीत राणा काँग्रेस-राष्ट्रवादीच्या पाठिंब्यावर अपक्ष म्हणून निवडून आल्या होत्या. पण नंतर त्यांनी भाजपाला पाठिंबा दिला. यावेळी त्यांनी भाजपाच्या पाठिंब्यावर लढण्याची तयारी केली आहे. मात्र शिंदे गटातील आनंदराव अडसूळ व अजित पवार यांच्या गटाच्या संजय खोडके यांचा त्याला थेट विरोध आहे. बच्चू कडू यांनीही त्यांच्या विरोधात उमेदवार उभा केला आहे. राज्य पातळीवर तीन पक्ष एकत्र आले असले तरी अनेक जिल्ह्यांत त्यांचे नेते परस्पर विरोधात उभे असल्याचे चित्र आहे. हे संघर्ष मिटवून निवडणुकीला एकसंधपणे सामोरे जाताना नेत्यांना बरीच कसरत करावी लागणार आहे. आघाडीतून आंबेडकर बाहेर, सांगलीवरून जुंपली ! प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीत सहभागी करून घेण्यासाठी गेल्या दीड महिन्यापासून चर्चा सुरू होती. पण यात यश येण्याची शक्यता जवळपास मावळली आहे. महाविकास आघाडीसोबत चर्चा करण्यापूर्वी उद्धव ठाकरे व प्रकाश आंबेडकर यांनी युती करण्याची घोषणा केली होती. पण उद्धव ठाकरे यांच्याबद्दल नाराजी व्यक्त करत शिवशक्ती आणि भीमशक्तीची आघाडी आता राहिलेली नाही, असे वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी जाहीर केले आहे. सांगलीच्या जागेवरून काँग्रेस व उद्धव ठाकरे यांच्यात वादाची ठिणगी पडली आहे. पक्षाचे दोन तृतीयांश आमदार, खासदार सोडून गेल्यामुळे शिवसेना (उद्धव ठाकरे) व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे दोन्ही पक्ष कमकुवत झाले असले तरी सक्षम नेतृत्व असल्यामुळे जागावाटपात त्यांचाच वरचष्मा आहे. त्यांच्यामागे काँग्रेसची फरफट होत असल्याबद्दल काँग्रेसमध्ये सुरुवातीपासून नाराजी होतीच. त्यातच शिवसेनेने सांगलीची जागा आम्हीच लढवणार असल्याचे सांगत दुहेरी महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांची उमेदवारीही जाहीर केली आहे. हिंगोलीची जागाही आम्हीच लढवणार असल्याचे खा. संजय राऊत यांनी स्पष्ट केले आहे. याबद्दल काँग्रेसमध्ये नाराजी आहे. सांगलीची जागा कोणत्याही परिस्थितीत काँग्रेसला मिळालीच पाहिजे, त्यासाठी टोकाची भूमिका घ्यावी लागली तरी चालेल, अशी भूमिका काँग्रेस नेते व माजी मंत्री विश्वजित कदम यांनी घेतली आहे. या पेचातून काँग्रेसश्रेष्ठींना तोडगा काढावा लागणार आहे.







# तिढा सुटेना, सुपारी फुटेना!

निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असताना व त्यानुसार निवडणूक प्रक्रिया सुरू झालेली असतानाही राज्यातील महायुती व महाआघाडी थेट रणांगणात भिडलेले पहायला मिळण्याऐवजी अद्याप खलबतखान्यातच दंग असलेले पहायला मिळतायत. पहिल्या टप्प्यात राज्यात विदर्भातील पाच जागांसाठी मतदान होणार आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रियाही सुरू झाली आहे. भाजपने नागपूरमधून नितीन गडकरी व चंद्रपूरमधून सुधीर मुनगंटीवार यांची उमेदवारी जाहीर केली आहे.

मात्र अद्याप भंडारा-गोंदिया, अमरावती, गडचिरोली-चिमूर, रामटेक या मतदारसंघांसाठीचे महायुतीचे उमेदवार जाहीर झालेले नाहीत. गडचिरोली-चिमूरच्या जागेवर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दावा ठोकला आहे. रामटेकवर शिंदे गटाचा दावा असला तरी भाजपला ही जागा हवी आहे. अमरावतीतून नवनीत राणा यांना भाजपची उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे पण त्यांच्या उमेदवारीला स्थानिक भाजप नेते व पदाधिका-यांचाच विरोध असल्याने अद्याप त्याबाबत निर्णय झालेला नाही. सध्या भाजपच्या शीर्ष नेतृत्वाला चार सौ पारच्या महत्त्वाकांक्षेने पछाडलेले आहे. या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्रातून ४५ जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या लक्ष्यपूर्तीसाठीच शिंदेंची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी आणि आता राज ठाकरेंची मनसे या पक्षांना सोबत घेऊन बेरजेचे राजकारण करण्याचा प्रयत्न भाजपने चालविला आहे. तर त्याला चोख उत्तर देण्यासाठी शरद पवारांची राष्ट्रवादी, उद्धव ठाकरेंची शिवसेना व काँग्रेसने महाविकास आघाडीची मोट बांधून प्रकाश आंबेडकरांच्या वंचित बहुजन आघाडीला सोबत घेण्यासाठीचे बेरजेचे राजकारण करण्याचा प्रयत्न केला आहे.

कागदावर महायुती व महाआघाडीसाठी बेरजेचे दिसत असलेले राजकारण प्रत्यक्ष जागावाटपात मात्र प्रचंड डोकेदुखीचे ठरत असल्याने ते वजाबाकीचेच राजकारण ठरणार की काय अशीच शंका निर्माण होते आहे. महायुतीत भाजपचा फॉर्म्युला जागावाटपात अंतिम शब्द ठरेल असा पक्षश्रेष्ठींचा अंदाज असावा. मात्र, शिंदे व अजित पवार यांनी जास्तीत जास्त जागा पदरात पाडून घेण्याचा हट्ट अद्याप तरी कायम ठेवल्याने महायुतीतील जागावाटपाचा तिढा सुटत नाही. त्यातच आता महायुतीत मनसेची एन्ट्री झाल्याने जागावाटपाच्या तिढ्यात नवे ट्विस्ट निर्माण झाले आहेत. त्यामुळे भाजपने राज्यातील आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली असली तरी अद्याप शिंदेंची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी व आता मनसे यांची उमेदवारी यादी निश्चित होऊ शकलेली नाही आणि या तिढ्यामुळे भाजपच्या उर्वरित उमेदवारांची यादीही निश्चित होऊ शकलेली नाही. त्यासाठी महायुतीच्या नेत्यांच्या दिल्ली वा-या सुरूच आहेत.शनिवारी महायुतीचे नेते पुन्हा दिल्लीत पोहोचले होते. दिल्लीत होणा-या बैठकीत महायुतीतील जागावाटपाच्या तिढ्यावर निर्णय होण्याची आशा महायुतीच्या नेत्यांना आहे. महायुतीत नाशिकच्या जागेवर भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि आता





मनसे या चारही पक्षांची दावेदारी आहे. रामटेक, कोल्हापूर आणि रत्नागिरी-सिंधुदुर्गवरून भाजप व शिंदेंच्या शिवसेनेत रस्सीखेच चालू आहे. धाराशिव, गडचिरोली व सातारा जागेवरून भाजप व राष्ट्रवादीत रस्सीखेच सुरू आहे. माढ्यात भाजपने रणजितसिंह नाईक निंबाळकर यांची उमेदवारी जाहीर केली असली तरी अजित पवार गटाचे रामराजे नाईक निंबाळकर व भाजपचे मोहिते पाटील यांनी उघड-उघड विरोधी भूमिका घेतली आहे. भाजपने उमेदवार न बदलल्यास आपला उमेदवार रिंगणात उतरवू अशी भूमिका मोहिते-पाटील गटाने घेतली आहे. तर बारामतीत शिंदे गटाच्या विजय शिवतारे व भाजपच्या हर्षवर्धन पाटील यांनी अजित पवारांच्या म्हणजे पर्यायाने राष्ट्रवादीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या विरोधात दंड थोपटले आहेत. स्थानिक नेत्यांमध्ये मतैक्य होत नसल्याने भाजपचा सोलापूरचा उमेदवार अद्याप निश्चित झालेला नाही. साता-यावर अजित पवार दावा सांगत आहेत व उदयनराजे उमेदवारीसाठी दिल्लीत तळ ठोकून बसले आहेत. मात्र, उदयनराजेंना उमेदवारी देण्यास साता-यातील स्थानिक भाजप नेत्यांचा विरोध आहे.हा तिढा पाहता भाजप सातारच्या जागेसाठी माढा अजित पवारांना सोडण्याचा तोडगा स्वीकारण्याची शक्यता आहे पण त्याबाबत अंतिम निर्णय दिल्लीतच होणार हे स्पष्ट आहे. यवतमाळ-वाशिम मतदारसंघात शिवसेनेच्या भावना गवळी यांना उमेदवारी देण्यास भाजपचा विरोध आहे तर रामटेकची जागा आपल्याकडे घ्या, असा भाजप नेत्यांचा फडणवीसांवर दबाव आहे. रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून भाजपला केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना रिंगणात उतरवायचे आहे पण शिंदे गट आपली दावेदारी सोडण्यास तयार नाही. मुंबईतील जागांबाबतही शिंदे गट व भाजपमध्ये अशीच रस्सीखेच आहे. भाजपला मुंबईत जास्तीत जास्त जागा हव्या आहेत व शिंदे गट त्या सोडण्यास तयार नाही. त्यात आता मनसेच्या एन्ट्रीने मुंबईतील जागावाटपाचा तिढा आणखीच क्लिष्ट होण्याची शक्यता आहे. महाविकास आघाडीतही सांगली, दक्षिण मध्य मुंबई, उत्तर पश्चिम मुंबई, ईशान्य मुंबई व भिवंडी या मतदारसंघावरून तिढा निर्माण झाला आहे. जालन्याच्या जागेसाठी काँग्रेस व शिवसेना दोघेही आग्रही आहेत. तर मुंबईत काँग्रेसला किमान दोन जागा हव्या आहेत. सांगलीत उद्धव ठाकरे यांनी चंद्रहार पाटील यांची उमेदवारी जाहीर केल्याने काँग्रेस नेते नाराज आहेत.

शनिवारी रात्री उशिरा काँग्रेसने नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली व रामटेकचे उमेदवार जाहीर केले आहेत. मात्र, चंद्रपूरच्या जागेबाबत काँग्रेस अंतर्गतच उमेदवारीसाठी रस्सीखेच आहे. धानोरकर यांच्या पत्नी व वडेट्टीवार यांच्या कन्येत उमेदवारीसाठी रस्सीखेच आहे. भाजपने मुनगंटीवार यांना उमेदवारी दिली असली तरी माजी खासदार हंसराज अहीर यांची नाराजी दूर करण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. एकंदर काय तर महायुती व महाआघाडीने एकमेकांना टक्कर देण्यासाठी बेरजेचे राजकारण म्हणून जास्तीत जास्त पक्ष एकत्र करण्याचा प्रयत्न केला असला तरी जागावाटपाच्या वाटाघाटीत ही बेरीज वजाबाकी ठरून तिढेच निर्माण होत आहेत. त्यातून जागावाटप वरचेवर लांबणीवर पडते आहे आणि स्थानिक पातळीवर सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचेच वातावरण आहे. थोडक्यात दोन्ही आघाड्यांची स्थिती तिढा सुटेना, सुपारी फुटेना अशीच झाली असल्याने निवडणुकीची प्रत्यक्ष रणधुमाळी कधी सुरू होणार याची प्रतीक्षाच आहे.

# महिलांच्या निरोगी आरोग्यासाठी रामबाण औषधी मानली जाते शतावरी, जाणून घ्या 'हे' आरोग्यदायी फायदे



निरोगी आरोग्यासाठी आयुर्वेदामध्ये अनेक औषधी वनस्पतींचा उल्लेख करण्यात आला आहे. या आयुर्वेदिक औषधी वनस्पती आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहेत. शतावरी ही एक उत्तम औषधी वनस्पती आहे, जी पर्वतांमध्ये आढळते. अनेक आयुर्वेदिक औषधांमध्ये तिचा वापर प्रामुख्याने केला जातो. महिलांच्या आरोग्यासाठी शतावरी अतिशय रामबाण औषधी मानली जाते.शतावरीमुळे मासिक पाळी नियमित येण्यास मदत होते. यासोबतच शरीरातील हार्मोन्स संतुलित ठेवण्याचे काम शतावरी करते. या शतावरीमध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई, व्हिटॅमिन के, प्रथिने, कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, फायबर इत्यादी पोषकघटक मुबलक प्रमाणात आढळून येतात. आज आपण शतावरीचे इतर आरोग्यदायी फायदे कोणते? ते जाणून घेणार आहोत.उच्च रक्तदाबासाठी फायदेशीर शतावरी आपल्या शरीरातील अतिरिक्त मीठ आणि टाकाऊ घटक काढून टाकण्याचे काम करते. विशेष म्हणजे शतावरीमुळे नैसर्गिक लघवीचे प्रमाण नियमित होण्यास मदत होते. त्यामुळे, आपल्या शरीरातील उच्च रक्तदाब नियंत्रित ठेवला जातो. यासोबतच णढख सारख्या समस्यांपासूनही आराम मिळतो. गरोदरपणात लाभदायी शतावरीमध्ये भरपूर प्रमाणात पोषकघटक आढळून येतात. फोलेटचे प्रमाण ही शतावरीमध्ये मुबलक आढळून येते, त्यामुळे, गर्भधारणेदरम्यान होणाऱ्या समस्या दूर होतात. या कारणामुळेच डॉक्टर गरोदरपणात शतावरीचे सेवन करण्याचा सल्ला देतात. शतावरीमध्ये असलेले फोलेट गरोदरपणाच्या सुरूवातीच्या महिन्यात बाळाच्या जन्माशी संबंधित असलेले दोष आणि जोखिम कमी करते. ज्यामुळे, बाळाचे आरोग्य निरोगी राहते. सूज कमी होते शतावरीमध्ये अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात आढळतात. या अँटिऑक्सिडंट्समुळे आपल्या शरीरातील ऑक्सिडेटिव्ह ताण कमी होतो आणि शरीरावरील सूज येण्याची समस्या देखील बऱ्याच प्रमाणात कमी होते. पचनक्षमता सुधारते शतावरीमध्ये फायबरचे भरपूर प्रमाण आढळते. त्यामुळे, शतावरीचे सेवन केल्यावर पचनक्षमता सुधारण्यास मदत होते. पोटाच्या समस्या कमी होऊन पचनक्रिया व्यवस्थित होते. पोटात गॅस होणे, बद्धकोष्ठतासारख्या समस्या जर तुम्हाला भेडसावत असतील तर शतावरीचे सेवन अवश्य करा. तुमच्या पोटाच्या समस्या दूर करण्यास शतावरी मदत करते.डिस्क्लेमर : सदर लेख फक्त सामान्य माहितीसाठी आहे. सकाळ माध्यम समूह अशा कोणत्याही गोष्टींची पुष्टी करत नाही. अधिक तपशीलांसाठी तुम्ही तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊ शकता.

# एक महिना 'हे' पाणी प्यायल्याने झपाट्याने वजन होईल कमी; कोलेस्ट्रॉलही राहील नियंत्रणात, एकदा फायदे वाचाच!



हिरव्या भाज्यांमध्ये भेंडीच्या भाजीला एक महत्त्वपूर्ण स्थान आहे. भेंडी खाणे बहुतेक सर्वांनाच आवडते. ही भाजी प्रत्येक हंगामात बाजारात सहज उपलब्ध असते. अनेकप्रकारचे पौष्टिक तत्व आणि प्रोटीन असल्याकारणाने भेंडी आरोग्यासाठी फार फायदेशीर राहते. भेंडीमध्ये फायबर, जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्सचं प्रमाण हे मोठ्या प्रमाणात असल्याने शरीरातील रक्ताचं प्रमाण संतुलित राहण्यास मदत होते. याशिवाय अन्नपचनक्रियाही सुधारते. त्यामुळेच भेंडीला सुपरफूड मानलं जातं. पण, फक्त भेंडीची भाजीच नाही तर त्याचे पाणीदेखील खूप फायदेशीर असते असे काही तज्ज्ञ सांगतात. बेंगळुरू येथील अथ्रेया हॉस्पिटलच्या मुख्य पोषणतज्ज्ञ, अक्षिता रेड्डी यांनी भेंडीचे पाणी प्यायल्याने आरोग्याला कोणते फायदे मिळतात, याविषयी माहिती दिली असल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊ.तज्ज्ञ सांगतात, भेंडीमध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात. भेंडी आपल्याला अनेक आजारांपासून वाचविते. भेंडीची आपण सहसा भाजी करतो, पण खूप कमी लोकांना माहिती असेल की भेंडीचं पाणीही शरीरासाठी तितकचं फायदेशीर असते. भेंडीच्या भाजी व्यतिरिक्त त्याचे पाणीदेखील आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. एक ग्लास भेंडीचे पाणी नियमितपणे प्यायल्याने शरीराला खूप फायदे होतात.१. मधुमेह असणाऱ्या रुग्णांसाठी भेंडीचे सेवन लाभदायी आहे. मधुमेह असणाऱ्या रुग्णांनी दररोज भेंडीच्या पाण्याचे सेवन केल्यास त्यांच्या रक्तात वाढलेली साखर कमी होण्यास मदत होईल.२. भेंडीचे पाणी हृदयाला निरोगी ठेवते. यातील पॅक्टिन कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते. भेंडीतील विघळणारे फायबर रक्तातील कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवते. शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी झाल्याने हृदयाशी निगडीत समस्या दूर होतात.३. भेंडीच्या पाण्यात फायबरचे प्रमाण पुरेसे असते. फायबर पचनाच्या समस्या दूर करण्यासाठी मदत करते. भेंडीच्या पाण्यात फायबर असल्याने पोट साफ करण्यात ते फायदेशीर ठरते. यामुळे बद्धकोष्ठतेची समस्या दूर होण्यात मदत होते.४. अस्थमा रुग्णांसाठी भेंडीचे पाणी अतिशय फायदेशीर ठरते. यामुळे रोगप्रतिकारकशक्ती वाढण्यास मदत होते. किडनीच्या समस्या दूर करण्यासही हे पाणी उपयुक्त ठरते. ५. भेंडीचे पाणी एक महिना सतत सेवन केल्याने तुम्ही तुमचे वजन नियंत्रित करू शकता. भेंडीमध्ये भरपूर व्हिटॅमिन बी, सी, फॉलिक सिड, फायबर इत्यादी असतात. हे वजन कमी करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी तुमची भूक नियंत्रित करण्यास मदत करतात. एक गोष्ट लक्षात ठेवा, भेंडीचे पाणी पिण्याचे फायदे भरपूर असले तरी प्रत्येकाने सावधगिरी बाळगली पाहिजे. भेंडीचे पाणी सामान्यतः वापरण्यासाठी सुरक्षित असले तरी त्यामुळे पाचन समस्या उद्भवू शकतात.या पाण्याच्या जास्त सेवनाने मळमळ किंवा उलट्या यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. भेंडीची लर्जी असलेल्या व्यक्तींनी भेंडीचे पाणी टाळावे. हे धोके कमी करण्यासाठी भेंडीचे पाणी कमी प्रमाणात सेवन करावे, असेही अक्षिता रेड्डी नमूद करतात.

# वर्षभरापूर्वी फसवणूक झालेल्या तरुणीची पुन्हा फसवणूक, यावेळी ४ लाखांचा गंडा




नाशिक : वर्षभरापूर्वी भेटवस्तू खरेदीच्या नावाखाली आर्थिक फसवणूक झालेल्या तरुणीस पैसे परत मिळवून देण्याच्या बहाण्याने दुसऱ्या भामट्याने तरुणीची पुन्हा चार लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. याप्रकरणी मुंबईनाका पोलिस ठाण्यात तरुणीच्या फिर्यादीनुसार, संशयित मयंक बांधवारा (रा. हरियाणा) याच्याविरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मुंबई नाका परिसरातील रहिवासी २८ वर्षीय तरुणीच्या फिर्यादीनुसार, संशयित मयंक याने जुलै २०२३ ते २५ मार्च २०२४ या कालावधीत ३ लाख ९१ हजार ५० रुपयांचा गंडा घातला. संबंधित तरुणी उच्चशिक्षित असून ती वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहे. गत वर्षी तिला भेटवस्तू खरेदीच्या माध्यमातून अज्ञात व्यक्तीने आर्थिक फसवणूक केली होती. याबाबत तरुणीने पोलिसांकडे तक्रार केली नसल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, तरुणीच्याच ओळखीतील संशयित मयांक याच्या लक्षात हा प्रकार आला होता. त्याने तरुणीस फसवणुकीची रक्कम मिळवून देण्याचे आमिष दाखविले. त्यासाठी 'प्रोसेसिंग फी'च्या नावाखाली संशयिताने तरुणीकडून ऑनलाइन स्वरुपात पैसे घेतले. पैसे घेतल्यानंतर संशयिताने तरुणीशी संपर्क कमी केला. तरुणीने पैशांची मागणी केली असता त्याने टाळाटाळ केली. त्यामुळे तरुणीने संशयितारोधात फसवणूकीची फिर्याद दाखल केली आहे.

# मांजरा नदी कोराडीठाक; उजेड परिसरात पाणीटंचाई

शिरुर अनंतपाळ : शकील देशमुख शिरूर अनंतपाळ तालुक्यातील उजेडलगत वाहत असलेली मांजरा नदी कोरडी ठाक पडली असल्याने परिसरात पिण्याच्या पाण्यासह सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. डोंगरगाव बॅरेज असले तरी डोंगरगाव ते धनेगाव बॅरेजमधील अंतर मोठे असल्याने मार्चमध्येच मांजरा पात्रात थांबलेले पाणी संपल्याने नदी कोरडीठाक पडली आहे. त्यामुळे येणा-या काळात उजेड, बिबराळ, बाकली व राणी अंकुलगा भागात छोटे बंधारे बांधून पाणी टंचाई दुर करावी, अशी मागणी ग्रामस्थ व शेतक-यातून केली जात आहे.तालुक्यात मोठा किनारा लाभलेल्या मांजरा नदीत पावसाळ्यात थांबलेले पाणी मार्च अखेर संपत असल्याने मांजरा नदी काठच्या गावांना तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. बागायती सिंचनाचा प्रश्न निर्माण होत आहे. मार्चनंतर उजेड बिबराळ बाकली राणी अंकुलगा सह अन्य गावांना पाणी मिळायचे झाल्यास या परिसरात आणखी बॅरेजस उभारणे आवश्यक झाले आहेत. दरम्यान तालुक्यातील डोंगरगाव बोरी येथे मांजरा नदीवर एकमेव बॅरेज उभारण्यात आले आहे. शेवटी देवणी तालुक्यातील धनेगाव येथे बॅरेज उभारण्यात आले आहे. पावसाळ्यात धनेगाव बॅरेज भरल्यानंतर उजेडपर्यंत मांजरा पात्रात पाणी थांबते मात्र धनेगाव ते डोंगरगाव हे अंतर अधिक असल्याने हे पाणी फार काळ थांबत नाही. परिणामी या परिसरातील ग्रामस्थांना मार्च अखेर पाणी टंचाईचा तर शेतक-यांना सिंचनाच्या अडचणीचा सामना करावा लागत आहे.

# बाल्टिमोर पूलाला धडकणा-या जहाजातील २२ भारतीय क्रू मेंबर्स सुरक्षित



अमेरिकेतून श्रीलंकेला माल घेऊन जाणाऱ्या कंटेनर जहाजाच्या धडकेमुळे मेरीलँड राज्यातील बाल्टिमोर शहरात ३ किमी लांबीचा पूल कोसळला आहे. न्यूज एजन्सी एएफपीच्या रिपोर्टनुसार, हे जहाज सिनर्जी मरीन ग्रुपशी संबंधित होते. ज्यात २२ क्रू मेंबर्स होते. हे सर्व जण भारतीय असून ते सुरक्षित असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, या जहाजाने फ्रान्सिस स्कॉट की ब्रिजला जाणूनबुजून लक्ष्य केल्याचा कोणताही पुरावा सापडला नसल्याचे बाल्टिमोर पोलिसांनी म्हटले आहे.न्यूयॉर्क टाइम्सने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकन वेळेनुसार रात्री दीडच्या सुमारास हा अपघात झाला. पुलावर आदळल्यानंतर कंटेनर जहाजाने लगेच पेट घेतला. सिंगापूरचा ध्वज असलेले हे जहाज श्रीलंकेची राजधानी कोलंबोला जात होते. २२ एप्रिलला ते श्रीलंकेत पोहोचणार होते.दोन वैमानिकांसह सर्व क्रू मेंबर्सची माहिती घेण्यात आली असून कोणीही दुखापतग्रस्त नाही. तसेच अपघातानंतर कोणतेही प्रदूषण झालेले नाही, असे चार्टर मॅनेजर, सिनर्जी मरीन ग्रुपने सांगितले. सिंगापूर ध्वजांकित हे जहाज नोंदणीकृत ग्रेस १९७७ मध्ये हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला होता. या पुलाचे नाव द स्टार-स्पँगल्ड बॅनरच्या लेखकाच्या नावावरून ठेवण्यात आले होते, असे एटीएने त्यांच्या वेबसाइटवर म्हटले आहे. फ्रान्सिस स्कॉट की १८१४ मध्ये फोर्ट मॅकहेन्रीवर झालेला बॉम्बस्फोट पाहिल्यानंतर पुलाजवळ बसला होता. असे मानले जाते की ज्यामुळे त्याला अमेरिकेचे राष्ट्रगीत लिहिण्याची प्रेरणा मिळाली. बाल्टिमोर पोर्टने गेल्या वर्षी सुमारे ८० अब्ज डॉलर किमतीच्या ५२ दशलक्ष टनांहून अधिक आंतरराष्ट्रीय मालवाहतूक केली. मेरीलँड सरकारच्या वेबसाइटनुसार, अमेरिकेतील बंदरांमध्ये बाल्टिमोर पोर्ट एकूण नवव्या क्रमांकावर आहे.

# महादेव जानकरांकडून उमेदवारीचे स्पष्ट संकेत; महायुतीकडून अद्याप घोषणा नाही

परभणी, : दोनच दिवसांपूर्वी महायुतीशी नाते जोडलेल्या रासपचे नेते महादेव जानकरांनी आपण परभणीतूनच लोकसभेची निवडणूक लढणार असल्याचे स्पष्ट संकेत दिले. मात्र, महायुतीकडून अद्यापतरी अधिकृतरित्या त्यांच्या नावाची घोषणा झालेली नाही. या पार्श्वभूमीवर त्यांच्या उमेदवारीने जिल्ह्याच्या विशेषतः महायुतीच्या वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट व भाजपकडून इच्छूक उमेदवारांचा मोठा हिरमोड होण्याची शक्यता आहे. दरम्यान, जानकर यांच्या उमेदवारीवर माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर यांनी बाहेरचा उमेदवार लादू नये, अशी आग्रही मागणी करताना भाजपलाच हा मतदारसंघ देण्यात यावा, अशी मागणीही केली आहे. परभणी लोकसभा मतदारसंघातील जातीय समिकरणे लक्षात घेवून १५ दिवसांपूर्वीच रासपचे नेते महादेव जानकर यांनी पत्रकार परिषदेतून आपण या मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छूक असल्याचे स्पष्ट केले होते. त्याचवेळी महाविकास आघाडी व महायुतीशीही आपली बोलणी सुरू असल्याचे त्यांनी म्हटले होते. महाविकास आघाडीकडूनही परभणी सोडवून घेवू, असे त्यांनी म्हटले होते. मात्र महाविकास आघाडीत ठाकरे गटाचे विद्यमान खा.संजय जाधव हे असल्याने महाविकास आघाडीकडून त्यांच्या नावाचा या ठिकाणी विचारही होवू शकत नाही, असे स्पष्ट झाले होते. साहजिकच पूर्वीपासून महायुती व त्यातही भाजपशी जवळीक असलेले मात्र मध्यंतरीच्या काळात भाजपपासून दूर केलेल्या जानकरांनी महायुतीशीच जवळीक साधणे सोईचे ठरेल. हे लक्षात घेवून दोन दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महायुतीत जाण्याचे निश्चीत करताना रासपसाठी एक मतदारसंघ त्यातही परभणी वा माढा सोडण्याची आग्रही मागणी केली. मात्र भाजपने माढ्यामध्ये यापूर्वीच उमेदवार जाहीर केलेला असल्याने व परभणीतील ओबीसी मतदारांमुळे आकृष्ट झालेले जानकर यांनी परभणीचाच विचार निश्चीत केला. महायुतीनेही त्या दृष्टीने त्यांना जागा देण्याचे कबुल केले.या पार्श्वभूमीवर परभणी रासपला सुटणार का? असा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर मंगळवारी स्वतः जानकर यांनी आपल्या फेसबुक वॉलवरून आपली उमेदवारी परभणीसाठी जाहीर केली. जानकर यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते कै.गोपीनाथ मुंडे यांच्या पत्नी प्रज्ञाताई यांचा आर्शिवाद घेत आपण परभणीकडे प्रचारासाठी रवाना होत असल्याची पोस्ट केल्याने त्यांची परभणीसाठीची उमेदवारी निश्चीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली. वास्तविक महायुतीकडून तसेच स्पष्टपणे जाहीर करण्यात आलेले नाही. त्यामुळे महायुतीतील इच्छूक उमेदवारांच्या आशा अजुनही धुसर झालेल्या नाहीत. मात्र अस्वस्थता वाढली आहे.महायुतीत अस्वस्थता परभणी लोकसभा मतदारसंघासाठी



अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश विटेकर यांनी आपली उमेदवारी निश्चीत होईल, या आशेने गेल्या सहा महिन्यांपासून मोठी तयारी चालविली आहे. अलीकडील काळात त्यांनी सर्वच विधानसभा मतदारसंघातील आपला संपर्क वाढविलेला आहे. प्रचाराची यंत्रणा देखील लावण्याचे नियोजन केलेले आहे. मागील निवडणूकीत ४२ हजार मतांच्या फरकाने पराभव पत्करावा लागल्याने यावेळी कोणतीही जोखीम स्विकारण्याची तयारी न दाखवता त्यांनी महायुतीतील सर्व नेतेमंडळींशीही जुळवून घेतलेले आहे. दुसरीकडे भाजपचे ज्येष्ठ नेते माजी आ.रामप्रसाद बोर्डीकर यांनीही भाजपच्या सर्व नेतेमंडळींच्या भेटीगाठी घेवून आपल्या उमेदवारीसाठी साकडे घातलेले आहे. राजकारणाचा प्रदिर्घ अनुभव असलेले बोर्डीकर यावेळी लोकसभेच्या रिंगणात सर्व ताकदिनिशी उतरण्यास सज्ञ असताना महायुतीने रासपसाठी हा मतदारसंघ सोडण्याच्या निर्णयामुळे या दोघांसह महायुतीतील सर्वच पक्षांमध्ये मोठी अस्वस्थता पसरली आहे.

# प्रशासन चांदी उद्योजकांच्या पाठीशी राहणार : जिल्हाधिकारी अमोल येडगे यांची ग्वाही

हुपरी : अमजद नदाफ : आचारसंहिता काळात हुपरी परिसरातील चांदी उद्योजक मार्गदर्शन केलेल्या नियमानुसार व्यापार करीत असताना एखादा अधिकारी संशयावरून चांदी माल जप्त करत असेल तर कोल्हापूर जिल्हा प्रशासन चांदी उद्योजकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील. अशी ग्वाही कोल्हापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा मुख्य निवडणूक अधिकारी अमोल येडगे यांनी दिली. चांदी उद्योजकांच्या प्रतिनिधीसोबत बोलवलेल्या बैठकीत ते बोलत होते.यामुळे आचारसंहिता काळात चांदी उद्योग सुरळीत राहण्यास मदत होणार आहे. तसेच ऐन हंगामात उद्योग चालू राहिल्यामुळे कारागिरावरील बेकारीचे संकट ही टळले आहे. या निर्णयाने चांदी उद्योजकातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. यासंदर्भात सर्वप्रथम दैनिक पुढारीनें आवाज उठवला होता.सध्या लोकसभा निवडणूक चालू आहे. त्यानंतर जवळपास वर्षभर जिल्हा परिषद, तालुका पंचायत, नगरपालिका व विधानसभा निवडणुका होणार आहेत. निवडणूकीदरम्यान आचारसंहिता काळात निवडणुका निष्पक्षपणे व्हाव्यात म्हणून निवडणूक आयोगाकडून जागोजागी तपासणी नाके उभारले जातात. हुपरी परिसरातील चांदी उद्योजक देशभरातील सराफांनी दिलेल्या ऑर्डर प्रमाणे तयार केलेले दागिने पोहोच करतात. त्यावेळी तपासणी नाक्यावरील अधिकारी आवश्यक कागदपत्रे असूनसुद्धा दागिने मतदारांना वाटप करायला घेऊन जात आहेत. या संशयावरून जप्त करतात. जप्त केलेले दागिने परत मिळवण्यासाठी चांदी उद्योजकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. त्यामुळे निवडणूक काळात चांदी उद्योजक व्यापार, उद्योग बंद करून घरी बसणे पसंत करतात.याबाबत हुपरी चांदी हस्तकला उद्योग विकास फाऊंडेशनने जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख तसेच जीएसटी विभाग प्रमुखांची भेट घेऊन आचारसंहिता काळात नेमकी कोणती कागदपत्रे सोबत असतील तर चांदी माल जप्त केला जाणार नाही. याबाबत लेखी मार्गदर्शन करण्याची मागणी केली होती. या विषयावर चांदी फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यासोबत विस्तृत चर्चा करून जिल्हाधिकारी यांनी चांदी माल वाहतूक दरम्यान आवश्यक कागदपत्राचे लेखी पत्र दिले आहे. त्याचबरोबर कागदपत्रे असूनसुद्धा देशात कोठेही माल जप्त करीत असतील तर जिल्हाधिकारी कार्यालयातील तक्रार निवारण केंद्रात फोन केल्यास कोल्हापूर प्रशासन चांदी उद्योजकांना योग्य ते सहकार्य करेल. याची ग्वाही दिली.यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी समाधान शेडगे यांच्यासह फाऊंडेशन संचालक मोहन खोत, ॲड. जितेंद्र देशमुख, कृष्णात बोरचाटे (सीए ), चेतन देशपांडे (सीएस ) विलासराव जाधव, अजित पाटील, शामराव शिंदे, निरंजन रणदिवे आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'लडाखसाठी लढा सुरूच राहणार', सोनम वांगचुक यांचे उपोषण मागे


पुढारी ऑनलाईन डेस्क : सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांनी मंगळवारी लेहमध्ये २१ दिवसांचे उपोषण ज्यूस पिऊन संपवले. यावेळी हजारो नागरिकांनी आंदोलनस्थळी पोहोचून आपल्या मागण्यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली. सोनम वांगचुक म्हणाले की, आता महिला कार्यकर्त्या हे उपोषण इतरांसोबत पुढे नेतील. केंद्रशासित प्रदेश असलेल्या लडाखला सहाव्या अनुसूचीअंतर्गत राज्याचा दर्जा मिळावा आणि घटनात्मक सुरक्षा प्रदान केली जावी, ही आमची मागणी पूर्ण होईपर्यंत हे उपोषण सुरूच राहणार आहे.'सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणवादी, इनोव्हेटर आणि शिक्षणसुधारक सोनम वांगचूक यांनी ६ मार्च २०२४ पासून लेहमध्ये आमरण उपोषण सुरू केले होते. त्यांच्या उपोषणाचा आज २१वा दिवस होता. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपल्या उपोषणाचे २१-२१ दिवसांचे टप्पे केले होते. जोपर्यंत केंद्र सरकार लडाखमधल्या जनतेच्या मागण्या मान्य करत नाही,



तोपर्यंत उपोषण सुरूच राहील, अशी माहिती सोनम यांनी उपोषणापूर्वीच दिली होती.उपोषण कशासाठी? केंद्रशासित प्रदेश असलेल्या लडाखला सहाव्या अनुसूचीअंतर्गत राज्याचा दर्जा मिळावा आणि घटनात्मक सुरक्षा प्रदान केली जावी, अशी मागणी सोनम वांगचुक आणि त्यांचे समर्थक केंद्र सरकारकडे करत आहेत. यासोबत त्यांनी लडाखसाठी लोकसभेच्या दोन आणि राज्यसभेच्या एका जागेची मागणी केली आहे. लडाखमधून लोकसभेत दोन आणि राज्यसभेत एक प्रतिनिधी गेला पाहिजे, अशी सोनम वांगचुक आणि त्यांच्या समर्थकांची मागणी आहे. या मागणीसाठी वांगचुक आणि त्यांचे समर्थक ६ मार्चपासून लेहमध्ये उपोषणाला बसले आहेत. या उपोषणापूर्वी ३ फेब्रुवारी रोजी लेहमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्यात आली होती.

# किनवट तालुक्यातील तरुणाई व्यसनाच्या विळख्यात ! पालकांना सतावते चिंता

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) चार पाच मित्र एकत्र बसले तरी ते एकमेकांना न बोलता आपपल्या मोबाईल वर ऑनलाईन व्यस्त असतात. आजकाल अशी परिस्थिती सर्वत्र बगायला मिळते. पूर्वीच्या काळी घरी पाहुणे आले आणि मुलाने चरण स्पर्श करून नमस्कार केला तर मुलगा संस्कारी आहे म्हणायचे पण आता काळ बदलला असून आजच्या काळात पाहुणे घरी आल्यानंतर मुलगा मोबाईल हातात न घेता पाहुण्यासोबत बोलत बसला तरी संस्कारी आहे म्हणायची वेळ आली आहे. शहरी व ग्रामीण भागात गुटखा, तंबाखू, सिगारेट, गांजा, मद्यपानाचा सर्वच वयातील व्यक्तींना विळखा पडला आहे. परंतु यात १७ ते ३० वयोगटातील मुले अधिक प्रमाणात आहारी जात असल्याचे चित्र किनवट तालुक्यात बघावयास मिळत असून पालक वर्गातून चिंता व्यक्त केली जात आहे. काही वर्षांपासून या मुलांना कुठल्या ना कुठल्याव्यसनाची सवय जडली असल्याचे गुटखा, मद्य व सिगारेटच्या वाढत्या विक्रीची आकडेवारीतून दिसत आहे. मुलांच्या नशेमुळे पालकांच्याही जीवाला घोर लागला असून, किनवट तालुक्यातील अंदाजे २० टक्के मुले नशेच्या विळख्यात अडकले असल्याचे बघायला मिळतील. मद्यपान करून नशेच्या धुंदीत धूम स्टाइल वाहने चालविताना होणाऱ्या अपघातामुळे अनेक तरुण



गंभीर जखमी, तर काही जण जीवाला मुकत आहे. मद्यपान, सिगारेट, गांजासह वेगवेगळ्या नशा करणाऱ्या तरुणांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. १७ ते ३० वयोगटातील ऐन उमेदीच्या काळात तरुणाई व्यसनाच्या विळख्यात सापडून उध्वस्त होणे ही चिंतेची बाब आहे. यातील बहुतांश तरुणाई शिक्षण पूर्ण झाल्यानंतर हाताला काम नसल्यामुळे वाम मार्गाला लागत असल्याचे बघायला मिळत आहे. किनवट तालुक्यात तरुणाला रोजगार मिळेल असा कुठलाही प्रकल्प व कारखाना नसल्यामुळे तरुणाई नैराश्यातून मोबाईल व इतर व्यसणामध्ये अधिकच अडकत चालली आहे. बरेच ठ ठिकाणी एकटा मुलगा आहे, त्याचे लाड पुरवायला हवे, या समजतीतून पालकही हवी तेवढी रक्कम पॉकीट मनीच्या नावाखाली देतात. त्यातून सिगारेटचे झुरके व बारमध्ये पेग भरताना तरुणाई दिसत आहे. कुणी गरिबीतून तर मोठ्या घरातील आसामी म्हणून अघोरी चंगळवाद करीत आहे. तर काही राजकीय नेते स्वतःच्या स्वार्थासाठी पार्टीच्या नावाखाली तरुणाईला बिघडवत आहेत. तरुणाई आधुनिक काळात आधुनिक व्यसन करताना दिसत आहे यामध्ये व्हाइटनर, वाहनाचे टायर पंक्चर दुरुस्तीसाठी वापरण्यात येणारे सोल्यूशन, कोरेक्स सिरप, सिगारेट, विडी, गुटखा व दारूचे व्यसन असलेल्यांचा समावेश आहे. ही नशा करण्यासाठी तरुणांनी काही चहा कॅन्टीन व इतर अड्डे बनविले आहेत. सायंकाळी एकत्र येऊन व्यसन केले जाते. नशेतून काही तरुण गुन्हेगारीकडेही वळल्याचे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. कोणतीही नशा ही विनाशाकडेच घेऊन जाते. आर्थिक व शारीरिक हानी करते. व्यसनात गुरफटलेली तरुणाई ही चिंतेची बाब आहे, त्यासाठी पालकांनी अधिक दक्ष राहण्याची गरज आहे. नशेच्या आहारी गेलेल्या व्यक्तीला सुधारण्यासाठी वेळीच समुपदेशनाची आवश्यकता आहे.

# अवैध पाणी उपसा रोखण्याची कार्यवाही गतिमान करावी-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे



लातूर : - जिल्ह्यातील जलाशयांमधील उपलब्ध पाणीसाठा पिण्यासाठी आरक्षित करण्यात आला आहे. त्यामुळे या पाण्याचा अवैधरित्या उपसा होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच अवैध पाणी उपसा करणाऱ्यांवर तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. जिल्ह्यातील पाणी टंचाईविषयक आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांच्यासह महानगरपालिका पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता विजयकुमार चव्हाण , पशुसंवर्धन विभाग, पाटबंधारे विभागाचे अधिकारी, तहसीलदार सौदागर तांदळे , गट विकास अधिकारी यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीला उपस्थिती होती. जिल्ह्यात पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी प्रकल्पाशी संबंधित जलसंपदा अथवा जलसंधारण विभागाचे शाखा अभियंता, महावितरणचे शाखा अभियंता, संबंधित महसूल मंडळ अधिकारी, पोलीस उपनिरीक्षक यांची पथके गठीत करण्यात आली आहेत. या पथकांनी गतिमान कार्यवाही करून जिल्ह्यात होणारा अवैध पाणी उपसा रोखावा, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केल्या. उपलब्ध पाणीसाठा, चारा, तसेच महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सुरु असलेल्या कामांचाही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी आढावा घेतला.

अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी भरारी पथकांमार्फत कारवाई जलाशयांमध्ये आरक्षित करण्यात आलेल्या पाणीसाठ्याचा उपसा करणाऱ्यांवर भरारी पथकांमार्फत कारवाई करण्यात येत असून आतापर्यंत ८६ विद्युतपंप जप्त करण्यात आले आहेत. तसेच १३८ विद्युत स्टार्टर, १०९ वायर बंडल जप्त करण्यात आले आहेत. तसेच ८७५ वीज कनेक्शन तोडण्यात आले असल्याची माहिती पाटबंधारे विभागाने दिली आहे.

नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा : जिल्हाधिकारी जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणार्थ विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या असून पिण्यासाठी आरक्षित केलेल्या पाण्याचा अवैध उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहे. त्यामुळे कोणीही पाण्याचा अवैध पद्धतीने उपसा करू नये. तसेच संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेवून नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा. पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन जिल्हाधिकारी

# संभाजी महाविद्यालयात महिला दिन साजरा




मुरूड/महेंद्र आल्टे : जागतिक महिला दिनानिमित्त संभाजी महाविद्यालयांमध्ये भित्तीपत्रकाचे प्रकाशन, विद्यार्थी विद्यार्थीनींची शारीरिक तपासणी, रांगोळी स्पर्धा व मार्गदर्शनपर कार्यक्रम आदी कार्यक्रम संपन्न झाले. महाविद्यालयामध्ये शिक्षणस्फूर्ती सावित्रीबाई फुले युवती मंच, इंग्रजी व इतिहास विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ मार्च २०२४ रोजी जागतिक महिला दिन दिनानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी महाविद्यालय रेणापुर येथील इंग्रजी विषयाच्या प्रा. डॉ. क्रांती मोरे या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक काळम उपस्थित होते. तसेच इतिहास विभाग प्रमुख प्रा . डॉ.दिनकर रणदिवे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांच्या व प्राचार्यांच्या हस्ते 'महिला सबलीकरण' संदर्भात एकूण चार भित्तीपत्रकांचे विमोचन करण्यात आले.मार्गदर्शनपर कार्यक्रमात डॉ.क्रांती मोरे म्हणाल्या की, महिला दिन हा स्त्रियांसाठी लाजिरवाणा दिवस आहे म्हणून तो नष्ट केला पाहिजे. सर्वांनी विकास करून प्रत्येक स्त्रीने न डगमगता वाघिणीसारखे गुरगुरले पाहिजे कारण कोणतीही स्त्री ही स्त्री म्हणून जन्माला येत नाही तर समाज तिला स्त्री म्हणून वागवत व बनवत असतो म्हणून प्रत्येक स्त्रीच्या मनगटात शक्ती निर्माण झाली पाहिजे तिला माणूस बनता आले पाहिजे. स्वतःची ओळख निर्माण करता आली पाहिजे प्रत्येक स्त्रीने आपली जबाबदारी देखील ओळखली पाहिजे मला जे येत नाही ते करणे म्हणजे प्रगती होईल जे सगळ्यांसाठी चांगले ते आपण स्वतः करावे हे सर्व करण्यासाठी स्त्री जेव्हा घराबाहेर पडते तेव्हा आप्तस्वकीय यांना तिची काळजी व चिंता असते पण इतरांचे प्रयत्न मात्र ती कुठे वाम मार्गात सापडेल यासाठी चालू असतात म्हणून प्रत्येकीने खूप दक्ष राहिले पाहिजे तसेच स्त्रीला नकार दर्शविता आला पाहिजे कारण नकाराला कारण असते. जी नाही म्हणते ती सावित्री व जिजाऊ होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनी म्हटले की, आजच्या तरुणांनी एखाद्या रस्त्याला महापुरुषांचे नाव देण्यापेक्षा त्या महापुरुषांनी दिलेल्या विचारांवर मार्गक्रमण करावे सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय समिती प्रमुख डॉ. मीना कदम यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. साखरे प्रिया यांनी तर आभार कु.पठाण तब्बू हिने मानले. सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर स्वरचित कविता कु.श्रद्धा गुंड यांनी सादर केली तर 'शिकून स्वाभिमानी आणि जगू दे ग आई' हे गीत कु.अंजली केवळराम हिने सादर केले. याप्रसंगी घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेत कु.अनुराधा क्षीरसागर, प्रथम क्रमांक , कु.कांबळे वैष्णवी यांचा द्वितीय तर कु. खडके निकिता तृतीय क्रमांक पटकावला. कार्यक्रमास प्रा.राहुल पवार, प्रा. शैलेंद्र सुतार आदी प्राध्यापक, बहुसंख्य विद्यार्थी विशेष करून विद्यार्थीनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सरकारने आश्वासन न पाळल्याने वडार समाजाचा निवडणुकीवर बहिष्काराचा इशारा



लातूर, दि. २६ (प्रतिनिधी) : तत्कालीन मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी वडार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध आश्वासने दिली होती. परंतु त्याची अंमलबजावणी झाली नसल्याने 'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व लोकसभा मतदारसंघात मतदानावर बहिष्कार घालण्याचा इशारा देण्यात आला आहे. ही माहिती संघटनेचे राज्य उपाध्यक्ष श्री. शिवाजी बाळाप्पा चव्हाण यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली.'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेची बैठक लातुरात घेण्यात आली. बैठकीला महाराष्ट्र उपाध्यक्ष श्री शिवाजी बाळाप्पा चव्हाण, लातूर जिल्हा अध्यक्ष तुकाराम चव्हाण व श्याम जाधव, उदगीर तालुका अध्यक्ष रामास्वामी कुशाळकर, औसा तालुका अध्यक्ष श्रीकांत चव्हाण, देवणी तालुका अध्यक्ष परमेश्वर बिजापूरे, अहमदपूर तालुका अध्यक्ष विश्वनाथ जाधव,तयप्पा चव्हाण निलंगा तालुकाध्यक्ष, मुरुडचे कार्यकर्ते संतोष देवकर यांच्यासह राज्याच्या सर्व भागातून समाज बांधव उपस्थित होते.सोलापूर येथे २०१८ मध्ये वडार समाजाचा राज्यस्तरीय मेळावा घेण्यात आला होता. यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी वडार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळ्या घोषणा केल्या होत्या. परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. श्री फडणवीस यांनी वडार समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करू, समाजाच्या वस्तीची जागा त्यांच्या मालकीची करू, समाजातील तरुणांना रोजगार देऊ, विद्यार्थ्यांसाठी वस्तीग्रह सुरु करू, वडार समाजाच्या मजूर सोसायट्यांना दहा टक्के कामे आरक्षित ठेऊ, समाजातील तरुणांनी उद्योग व्यवसाय करावा म्हणून स्वतंत्र कै. पहेलवान मारुती चव्हाण -वडार आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करू, महामंडळाच्या अध्यक्षाना राज्यमंत्र्याचा दर्जा देऊन १०० कोटीची आर्थिक तरदूत करण्याचे अश्वासन दिले होते. तसेच वडार समाजातील बेघर लोकांना घरबांधणीसाठी निधी देऊ, समाजाच्या योजना लाभार्थीपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्यस्तरीय समितीची घोषणा आणि सदर समितीचे अध्यक्षपदी वडार समाजाचे नेते श्री विजय दादा चौगुले यांची नियुक्ती करण्याची घोषणा श्री फडणवीस यांनी केली होती. पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीमध्ये सदस्यपदी वडार समाजाच्या नेत्याची नियुक्ती करून ठिकठिकाणी बजरंग बलीचे मंदिर उभारण्यात येईल, इधाते समितीच्या रिपोर्टची अंमलबजावणी करू आदी आश्वासनेही दिली होती. आजपर्यंत वरील आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्हे वडार आर्थिक विकास महामंडळातून वगळण्यात आलेले आहेत. व वडार समाजाचा केवळ मतांसाठी वापर होत आहे.राज्याच्या विकासात मोठे योगदान असलेला वडार समाज स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही मुख्य प्रवाहापासून कोसो दूरच आहे. सत्ताधाऱ्यांनी वेळोवेळी आश्वासने देऊनही वडार समाजाचा केवळ मतासाठीच वापर केला आहे. सत्तेवर आल्यानंतर मात्र आश्वासनाची पूर्तता केली जात नाही. त्यामुळे अशा संधीसाधू राजकारण्यांच्या विरोधात, हा एलगार वडार समाजाने पुकारला असून कोणत्याही परिस्थितीत बहिष्कारपासून मागे हटणार नाही, असेही संघटनेचे राज्य उपाध्यक्ष श्री शिवाजी चव्हाण यांनी सांगितले.

# थकीत कराच्या वसुलीसाठी मालमत्तांना ठोकले सील मनपाची कारवाई नागरिकांनी मालमत्ता कर लवकरात लवकर भरण्याचे आवाहन



लातूर/प्रतिनिधी: मालमत्ता कर थकीत असणाऱ्या दोन मालमत्तांना मनपाच्या पथकाने मंगळवारी (दि.२६ ) सील ठोकले. वारंवार नोटिसा देऊनही कर भरणा केला जात नसल्याने पालिकेच्या वतीने ही कारवाई करण्यात आली. मालमत्ताधारकांनी आपल्याकडील कर लवकरात लवकर भरणा करावा अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल असा इशाराही मनपाच्या वतीने देण्यात आला. लातूर एमआयडीसी परिसरातील धीरज टाइल्स यांच्याकडे २३ लाख ४४ हजार ६७१ रुपये थकबाकी होती.तसेच पॅनिका एनर्जी यांच्याकडेही मालमत्ता करापोटी ३१ लाख रुपये कर थकलेला होता.या दोन्ही मालमत्तांना मंगळवारी मनपाच्या वतीने सील ठोकण्यात आले. मनपा उपायुक्त शुभम क्यातमवार यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली.कर अधिक्षक सतीश टेंकाळे मनपाचे पथक प्रमुख समाधान सूर्यवंशी,जे.एम.ताकपिरे, सहाय्यक पथक प्रमुख चंद्रकांत बावगे,कर निरीक्षक प्रदीप जोगदंड, वसुली लिपिक संतोष फिसके, कुरकुट यांच्या पथकाने ही कारवाई करण्यात आली. एमआयडीसी परिसर, कृषी उत्पन्न बाजार समिती परिसर तसेच शहराच्या इतर भागात ज्या नागरिकांचा मालमत्ता कर थकलेला आहे अशा मालमत्ता धारकांनी आपल्याकडील कराची थकबाकी दिनांक ३१ मार्च पूर्वी मनपाकडे जमा करून व्याज माफी योजनेचा लाभ घ्यावा. वेळेच्या आत मालमत्ता कराचा भरणा करण्यात आला नाही तर थकीत मालमत्ता धारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल,असा इशाराही मनपाकडून देण्यात आला आहे.

# जागतिक क्षयरोग दिनानिमित्त रॅलीद्वारे जनजागृती

लातूर, दि. २६ : जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली २४ मार्च २०२४ रोजी जागतिक क्षयरोग दिनानिमित जनजगागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे उद्घाटन विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता उदय मोहिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.प्रदिप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वडगावे एच.व्ही. यांच्या हस्ते हिरवा झेंडी दाखवून करण्यात आले.रॅलीसाठी सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ.प्रविण ढगे, डॉ.विद्या गुरुडे, डॉ.पाठक एस.जी., जिल्हा क्षयरोग अधिकारी श्रीमती डॉ. एस.एन.तांबारे, डॉ.मोनिका पाटील, मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. महेश पाटील, डॉ.अनंत कलमे, डॉ .हर्षवर्धन राऊत, वैद्यकीय अधिकारी डॉ.रुपनर डी.के., जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.बाळासाहेब जाधव यावेळी उपस्थित होते.या रॅलीमध्ये शहरातील विविध भागातून जनजागृती करण्यात आली आहे. महात्मा गांधी चौक, बस स्थानक, गंज गोलाईमार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे रॅलीची सांगता झाली. बाभळगाव नर्सिंग कॉलेज व विलासराव देशमुख नर्सिंग कॉलेज येथील विद्यार्थी रॅलीमध्ये सहभागी झाले होते.



# महाआरती व फटाक्यांच्या आतिषबाजीने यात्रेची सांगता



लातूर/प्रतिनिधी: मान्यवरांच्या हस्ते महाआरती केल्यानंतर फटाक्यांच्या आतिषबाजीने मागील १७ दिवसांपासून सुरू असणाऱ्या ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवाची उत्साहात सांगता झाली. उपजिल्हाधिकारी रोहिणी नऱ्हे व देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांच्या हस्ते श्री सिद्धेश्वरांची महाआरती करण्यात आली.यानंतर फटाक्यांच्या नयनरम्य आतिशबाजीला सुरुवात झाली.महाशिवरात्री रोजी दि.८ मार्च पासून सुरू असणाऱ्या यात्रा महोत्सवाची सांगता झाली.यावेळी वृंदावन येथील हभप जनार्दन महाराज यांचे काल्याचे कीर्तन संपन्न झाले.यावेळी महाप्रसादाचे वाटपही करण्यात आले. महाशिवरात्रीपासून अतिशय हर्षोल्हासात यात्रा महोत्सव संपन्न झाला.या कालावधीत मान्यवरांसह लाखो भक्तांनी श्री सिद्धेश्वरांचे दर्शन घेतले.दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना पिण्याच्या पाण्यासह विविध सोयी-सुविधा देवस्थानने उपलब्ध करून दिल्या होत्या.जिल्ह्यातील हजारो नागरिक,युवक- युवती व अबालवृद्धांनी यात्रेचा आनंदही लुटला. विविध प्रकारचे रहाटपाळणे तसेच इतर माध्यमातून या महोत्सवाचा आनंद घेत खरेदी केली. समारोप प्रसंगी संपन्न झालेली महाआरती व आतिषबाजीच्या प्रसंगी अशोक भोसले,सुरेश गोजमगुंडे,नरेश पंड्या, विशाल झांबरे व्यंकटेश हालिंगे,ओम गोपे,दत्ता सुरवसे यांच्यासह देवस्थानचे विश्वस्त व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांच्याहस्ते लातूरचे खासदार सुधाकर श्रृंगारे यांचा सत्कार

लातूर दि.२६-०३-२०२४ लातूर लोकसभा मतदार संघातील भाजपा व महायुती आघाडीचे उमेदवार खा.श्री.सुधाकरराव श्रृंगारे यांनी कैलास निवास मजगे नगर येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता मा.आ.व भाजपा किसान मोर्चा गोवा व गुजरातचे प्रभारी श्री.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी कव्हेकर परिवाराच्या वतीने शॉल,पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. तसेच भाजपा लातूर जिल्हा प्रभारी प्रा.किरण पाटील यांचाही सत्कार केला. यावेळी लातूर जिल्हा शहर भाजपा अध्यक्ष देविदासराव काळे, लातूर जिल्हा शहर लोकसभा प्रभारी गुरूनाथजी मगे, भाजपाचे ग्रामीण जिल्हा सरचिटणीस निळकंठराव पवार हे उपस्थित होते.यावेळी लातूर मतदार संघातील निवडणूक विषया संदर्भात शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेबांनी काही विषय मांडले त्याप्रमाणे सुधारणा करूण व सर्वांना सोबत घेऊन प्रचार यंत्रणा राबवण्याचा विश्वास सर्व प्रमुखानी दिला. त्यामुळे श्री.सुधाकरराव श्रृंगारे हे प्रचंड मताधिक्याने विजयी होणार असा विश्वासही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.यावेळी शहर जिल्हा सरचिटणीस दिग्वीजय काथवटे,भाजयुमोचे शहरजिल्हा अध्यक्ष ॲड.गणेश गोमचाळे, लालासाहेब देशमुख. रविंद्रजी सुडे, आदी मान्यवरांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE